VOL- XI | ISSUE- XII | DECEMBER | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x

# मल्लविद्येतील जगज्जेता द ग्रेट मोहम्मंद गामा

**डॉ. शेखर ना. शिरसाठ**
शारीरिक शिक्षण संचालक तथा विभाग प्रमुख
म. शि. प्र. मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**गोषवारा**

*जगप्रसिद्ध भारतीय मल्ल मोहम्मद गामा हे कुस्तीच्या इतिहासातील एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. "अजिंक्य जगज्जेता" तसेच "द ग्रेट गामा" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गामाने आपल्या कौशल्याने भारतीय मल्लविद्येला जागतिक पातळीवर मान्यता मिळवून दिली. या संशोधनात गामाच्या जीवनप्रवासाचा आढावा घेतला असून, १९१० साली लंडनमध्ये पोलंडच्या झिस्को विरुद्ध झालेल्या ऐतिहासिक सामन्याचे विशेष वर्णन करण्यात आले आहे. झिस्कोच्या प्रचंड शरीरयष्टीसमोर गामाने आपल्या युक्ती, ताकद, आणि कौशल्याच्या बळावर विजय मिळवला. पतियाळा व कोल्हापूर संस्थानांच्या राजाश्रयामुळे गामाला आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळाली. त्यांच्या यशस्वी कारकिर्दीबरोबरच उतारवयातील आर्थिक चणचण आणि संघर्षही मांडण्यात आले आहेत. या संशोधनातून गामाचे योगदान, भारतीय कुस्ती परंपरेचा जागतिक प्रचार आणि त्यांचा वारसा आजच्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरतो.*

***Key words** (मुख्य शब्द): मल्लविद्या, जगज्जेता, गौरवशाली, मोहम्मंद गामा*

**प्रास्ताविक:**

**भा**रतीय कुस्ती परंपरा ही आपल्या सांस्कृतिक वारशाचा महत्त्वाचा भाग असून ती पराक्रम, ताकद, आणि शारीरिक तंदुरुस्तीचे प्रतीक मानली जाते. या परंपरेत अनेक थोर पैलवानांनी योगदान दिले, परंतु त्यापैकी मोहम्मद गामा यांचे स्थान सर्वश्रेष्ठ मानले जाते. "जगज्जेता गामा" या नावाने प्रसिद्ध असलेले गामा केवळ कुस्तीतील यशासाठीच नव्हे, तर आपल्या जिद्दीच्या आणि कौशल्याच्या जोरावर जागतिक स्तरावर भारतीय मल्लविद्येला मान्यता मिळवून देण्यासाठीही ओळखले जातात.

गामाचे कुस्ती क्षेत्रातील वर्चस्व आणि त्यांची जागतिक प्रसिद्धी १९१० साली लंडनमध्ये झालेल्या झिस्कोविरुद्धच्या ऐतिहासिक सामन्यामुळे अधिक प्रकाशझोतात आली. पतियाळा आणि कोल्हापूर संस्थानांच्या राजाश्रयामुळे गामाला परदेशात जाऊन आपल्या कौशल्याची चुणूक दाखवण्याची संधी मिळाली. त्यांच्या कुस्तीतील अप्रतिम युक्ती, अचूक तंत्र, आणि अफाट जिद्दीमुळे त्यांनी अनेक नामवंत परदेशी मल्लांना पराभूत केले.

हा संशोधन प्रबंध द ग्रेट गामाच्या जीवनप्रवासाचा आणि कुस्तीतील त्यांच्या योगदानाचा सखोल आढावा घेतो. तसेच, त्यांच्या विजयांनी भारतीय कुस्ती परंपरेवर कसा ठसा उमटवला, हेही उलगडून दाखवतो. गामाच्या संघर्षमय जीवनातून कुस्ती परंपरेचा भव्य इतिहास आणि त्याची प्रेरणा आजही भारतीय क्रीडा क्षेत्राला पुढे जाण्याचे बळ देते.

जगविख्यात भारतीय मल्लांपैकी सर्वश्रेष्ठ मल्ल म्हणजे जगज्जेत्या मोहम्मंद गामा होता. जगज्जेता गामा पतियाळाच्या महाराजाच्या अश्रित होता. त्याचप्रमाणे कोल्हापूर संस्थानचे राजर्षी शाहू छत्रपती महाराजांनी अनेक वर्ष त्याच्या खुराकाची व्यवस्था केली होती. त्याचा छोटा भाऊ इमाम बक्ष तर शाहु महाराजाचा अश्रित पैलवान होता. गामाची शरीरयष्टी प्रमाणबध्द व देखणी होती. गामा कुस्ती खेळतांना शक्ती व युक्तीचा सुंदर सांगड घालुन खेळत असे. भारतात तो अजिंक्य ठरला होता. जगालाही त्याने त्याचे कौशल्य दाखवावे असे पतियाळच्या महाराजांची आणि कोल्हापूरच्या शाहू महाराजांची त्याच्याकडून अपेक्षा होती. त्यासाठी शाहू महाराजांच्या प्रेरणेतून त्याने परदेश दौरा केला. अनेक नामवंत पैलवानांना त्याने चितपट केले. गामा पेक्षा मोठ्या वजनदार असलेल्या परदेशी मल्लांना गामाने लोळवले. त्यामुळे गामाशी लढायला कुणी तयार नव्हते. शेवटी वर्तमानपत्रात त्याने जाहीर आवाहने दिली. परदेशी पध्दतीनुसार कुस्ती लढण्याची तयारी दर्शविली. त्यावेळी काही बोटावर मोजण्या इतक्या विदेशी कुस्तीविरांनी गामाचे आव्हान स्वीकारले. मात्र त्यांना सर्वांना गामाने पराजित केले. त्यामुळे गामाची किर्ती सर्वदुर पसरली.

**झिस्को गामा लढत**

इ.स. १९१० साली लंडन येथील कुस्ती स्पर्धा भरवणारा कंत्राटदार बेजांमिन याने मोहम्मंद गामाची किर्ती कुस्ती कौशल्य बघुन जगज्जेता झिस्को बरोबर कुस्ती बांधण्यासाठी लंडनला नेले आणि त्याची कुस्ती ठरविली. झिस्को हा पोलंडचा प्रख्यात प्रबळ जगज्जेता मल्ल होता. त्याकाळी तो जगज्जेता अजिंक्य ठरला होता. जगज्जेता झिस्कोची कुस्ती मोहम्मंद गामाची १० सप्टेंबर १९१० रोजी लंडन येथील स्टेडियममध्ये घेण्याचे निश्चित झाले. क्रीडा क्षेत्र ढवळून निघाले. मोठे मोठे मथळे देवून गामा झिस्कोच्या कुस्तीची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली. जॉन बुल या पत्राचे संपादक होरेशिओ बॉटमली यांनी या कुस्तीत विजयी मल्लास अडिचशे पौंड (सदतीसशे पन्नास रुपये) रोख आणि सोन्याचा कमरपटटा बक्षिस देण्याचे जाहिर केले. त्यामुळे लोकांचे औत्सूक्यही शिगेस पोहचले होते.

इंग्लडमधील प्रसिध्द वर्तमानपत्रातून झिस्को आणि गामा यांच्या शरीरयष्टी बद्दल, क्रीडा कौशल्य आणि दिनचर्याबद्दल भरपुर प्रसिध्दी दिली होती. वर्तमानपत्राच्या दाखल्यावरुन दोन्ही कुस्तीशिलाची शरीरयष्टी पुढीलप्रमाणे होती.

| तपशील | झीस्को | मोहम्मद गामा |
|---|---|---|
| वजन | २५२ पौंड | २०२ पौंड |
| उंची | ५.९ फुट | ५.७ फुट |
| छाती | ५५.५ इंच | ४७ इंच |
| मान | २१ इंच | १७.५ इंच |
| दंड | २१ इंच | १७.५ इंच |
| मांडी | २९ इंच | २६ इंच |
| पोटरी | १८.५ इंच | १६ इंच |
| कमर | ४२ इंच | ३० इंच |

वरील वर्णनावरुन झिस्कोच्या प्रचंड शरीरयष्टची सहज कल्पना येते. मोहम्मद गामा त्याच्यासमोर बराच लहान दिसत होता. दोघाची तयारी जोरदार झाली होती. शनिवार दिनांक १० सप्टेंबर १९१० रोजी जगज्जेते पदाच्या कुस्तीकरीता स्टेडियममध्ये ३०,००० कुस्तीप्रेमी जमा झाले. प्रेक्षकात एकच चर्चा होती, झिस्कोच्या प्रचंड शरीरयष्टी आणि ताकदी समोर गामाचा निभाव लागणार नाही.

कुस्तीची सुरुवात झाल्यावर क्षणातच गामाने झिस्कोला खाली धरुन आणले. प्रेक्षकांनी टाळयांचा कडकडाट केला. झिस्को दोन तास तसाच बसूनच राहीला. झिस्कोला चित करण्यासाठी गामाने जंगजंग पछाडले. परंतू झिस्कोचा प्रचंड देह व शक्तीसमोर गामाच्या डावाचा प्रभाव पडेना. झिस्को अजगरासारखा सुस्त पडुन होता. लोक रागाने त्याला झिस्को, अजगरासारखा काय पडून राहिलाय ! उठ ! आम्ही लढत पहायला आलो. झिस्कोला त्याची जाणिव झाली व तो सर्व बळ एकवटवून ताडकन उठला. गामाला कवेत घेऊन खाली आणले आणि मैदानाचा नुरच पालटला. झिस्को गामाला सोडणार नाही असे त्याच्या चाहत्यांना वाटायला लागले. गामाच्या बाजूने असणारे लोकांची नजर चिंतेने ग्रस्त झाली होती. त्यातच गामा चित्याच्या वेगाने झिस्कोच्या मगरमिठीतून सुटला. एवढेच नव्हे तर वायू वेगाने चढाई करून झिस्कोला पुन्हा खाली आणुन ताबा मिळवला.

संपूर्ण स्टेडियम प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. झिस्को पुन्हा मॅटला घोरपडीप्रमाणे चिकटुन राहिला. दोन तास पस्तीस मिनिटे झाले झिस्को चिकटूनच बसला, अंधार पडला. परंतू कुस्तीचा निकालच लागेना. झिस्को मॅट ला सोडत नव्हता. पंचाना कुस्ती निकालीच करायची होती. जागतिक अजिंक्यपदाचा निर्णय त्यावर अवलंबून होता. रात्र झाल्यावर शेवटी पंचांनी पुढच्या शनिवारपर्यंत कुस्ती तहकुब केली. हिच कुस्ती शनिवार दिनांक १७ सप्टेंबर १९१० रोजी होईल असे जाहिर करण्यात आले.

शनिवार दिनांक १७ सप्टेंबर १९१० रोजी ठरल्याप्रमाणे गामा मैदानात आला. संपुर्ण स्टेडियमवर टाळयांनी कडकडाट झाला. झिस्को काही आला नव्हता. ठरल्याप्रमाणे पंचांनी झिस्कोची आणखी काही वेळ वाट पाहिली. तो काही स्टेडियममध्ये आलाच नाही. पंचांनी रितसर गामाला विजयी घोषित केले. गामा विजयी झाला, जगज्जेता झाला. गामाच्या चाहत्यांनी पूर्ण स्टेडियम डोक्यावर घेतले होते. जगज्जेता मल्ल श्रेष्ठ गामा की जय, असा त्रिवार जयघोष झाला. भारतातही मोठा उत्सव झाला. अशा थोर जगज्जेत्या मोहम्मद गामाने अशी अनेक मैदाने गाजवली. परंतु भारताला स्वातंत्र्यानंतर गामाने पाकिस्तानात जाणे पसंत केले त्यामुळे त्याच्या उतार वयात मात्र आर्थिक चनचनी बरोबरच हालअपेष्टा झाल्या.

VOL- XI ISSUE- XII DECEMBER 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

**निष्कर्ष**

मोहम्मद गामा यांचे जीवन व कारकिर्द भारतीय कुस्ती परंपरेचा गौरवशाली अध्याय आहे. त्यांच्या अथक मेहनतीने, जिद्दीने आणि अचूक कौशल्याने भारतीय मल्लविद्येला जागतिक स्तरावर सन्मानाचे स्थान मिळवून दिले. गामाने केवळ परदेशी मल्लांना पराभूत करून भारतीय कुस्तीचा झेंडा उंचावला नाही, तर अनेक पिढ्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरले.

झिस्कोविरुद्धच्या लंडनमधील ऐतिहासिक विजयाने गामाने जगज्जेत्याचा किताब जिंकला, मात्र त्याच्या यशाच्या पलीकडे त्याच्या जीवनातील संघर्ष आणि उतारवयातील हालअपेष्टांमुळे त्याच्या कर्तृत्वाची दुसरी बाजूही उघड झाली. गामा केवळ एक पैलवान नव्हते, तर ते भारतीय परंपरेच्या सामर्थ्याचे प्रतीक होते. त्यांच्या जीवनातून मेहनत, जिद्द, आणि कष्टाची शिकवण मिळते. या थोर मल्लाचे योगदान आजही भारतीय क्रीडा क्षेत्राला दिशा दाखवत राहील. गामा यांचे जीवन म्हणजे विजयाचा व जिद्दीचा एक अद्वितीय आदर्श आहे.

**संदर्भ**

१. के. पी. भागवत, शरीर संपदा, वरदा प्रकाशन, पुणे, २०००,
२. कृ.गो. सुर्यवंशी, भारतीय मल्लविद्या उदय आणि विकास, महाराष्ट्र राज्य कुस्तीगिर परिषद प्रकाशन, पुणे.
३. गो. ना. पुरंदरे, शारीरिक शिक्षणाचा इतिहास, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९९२.
४. मनोज जोशी, भारतीय मल्ल विद्या, पुष्पांग प्रकाशन, हरीयाण, १९९३.
५. दत्तात्रय चिंतामण मुजूमदार (करंदीकर) (संपादक व प्रकाशक), व्यायाम कोश, खंड १ ते १०, १९४९.